लोकमत

भानुदास पऱ्हाड

# 'एमआयटी'त सायबर वॉरियर क्लबची स्थापना

## या उपक्रमांतर्गत सायबर शिक्षणासाठी सायबर सुरक्षा ही मोहीम राबविण्यात येणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**आळंदी** : आळंदीतील एमआयटी महाविद्यालयात क्विक हील फाउंडेशनच्या सहकार्याने "क्विक हील सायबर वॉरियर" क्लबची स्थापना करण्यात आली. संस्थेने क्विक हील फाउंडेशनसोबत सामंजस्य करार केला असून, त्याअंतर्गत हा क्लब स्थापन करण्यात आली आहे. या क्लबची स्थापना क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्ष अनुपमा काटकर यांच्या हस्ते पार पडली.

या उपक्रमांतर्गत सायबर शिक्षणासाठी सायबर सुरक्षा ही मोहीम राबविण्यात येणार असून, संगणक शास्त्राचे शिक्षण घेणारे विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून कार्य करणार आहेत. सायबर वॉरियर्स शाळांमध्ये व समाजात हे स्वयंसेवक सायबर सुरक्षेविषयी जनजागृती निर्माण करणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांमार्फत सादरीकरणे, जनजागृती मोहिमा तसेच ऑनलाइन आणि ऑफलाइन माध्यमांतून प्रचार करण्यात येणार आहे. या क्लबसाठी कॉम्प्युटर ॲप्लिकेशन विभागाचे प्रा. अमित ताले हे शिक्षक समन्वयक म्हणून नियुक्त असून, क्लबच्या प्रमुख पदांवर अध्यक्ष हिंदवी खरमाळे, सचिव शिवप्रसाद जाधव, संचालक आयुष इचे व मीडिया संचालक म्हणून मानस पाटील या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत एकूण २० विद्यार्थी सायबर वॉरियर म्हणून कार्यरत राहणार आहेत. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कॉम्प्युटर ॲप्लिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. विकास महांडुळे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.